# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## विद्यापीठ विकास विभाग

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली – ४४२६०५(महा.)
फोन:०७१३२.२२३३२२ फॅक्स क्र ०७१३२.२२३३२२
**Email :** bcud.gondwanauniversity@gmail.com
**web:** gondwana.digitaluniversity.ac
**web:**unigug.org

जा. क्र/विविवि./२८५८/२०१७ दिनांक ०६/१० /२०१७

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

विषय : भाषाविज्ञान या विषयात एम. ए. करणाऱ्या विद्यार्थांना शिष्यवृत्ती देण्याबाबत.

संदर्भ :– राज्य मराठी विकास संस्था यांचे क्र.शिष्यवृत्ती/प्र.क्र.३१/प्रकल्प–३/६९६/२०१७
दिनांक २२/०९/२०१७

महोदय,

उपरोक्त संदर्भाकिंत विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, राज्य मराठी विकास संस्था, महाराष्ट्र शासन पुरस्कृत यांचेद्वारे विविध उपक्रम राबविण्याकरिता शास्त्रशुध्द अभ्यास करवून घेण्यासाठी भाषाविज्ञान या विषयात एम. ए. च्या अभ्यासक्रम करू इच्छिणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांला वार्षीक रू. १ लक्ष २० हजार रूपयांपर्यंतची शिष्यवृत्ती देण्यासाठी योजना सन २०१७–१८ या वर्षांपासून राबविण्याचे सदर संस्थेने ठरविलेले आहे.

भाषाविज्ञान या विषयात एम. ए. च्या विद्यार्थ्यांकरिता जास्तीत जास्त १० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येईल असे संदर्भीय पत्रात नमूद केलेला आहे. त्याकरिता महाविद्यालयांनी व संस्थानी भाषाविज्ञान या विषयात एम. ए. करणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती संदर्भात पत्राचे अवलोकन करावे, ही विनंती.

सधन्यवाद!

सहपत्रः– संदर्भ पत्र

उपकुलसचिव (प्र.)
विद्यापीठ विकास विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

उपकुलसचिव
विकास विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. ....... दि. ........
पावक क्र. ५४४० दि. 21/9/17

# राज्य मराठी विकास संस्था

(महाराष्ट्र शासन पुरस्कृत)
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई - ४००००१
दूरध्वनी : (०२२)२२६३१३२५ / २२६५३९६६
मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क. एफ १६०९४ (मुंबई) संकेतस्थळ : http://rmvs.maharashtra.gov.in ★ इ-टपाल : rmvs_mumbai@yahoo.com

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
आस्थापना विभाग
आवक क्र. 2625 दि. 21.9.17
जावक क्र. ........ दि. ........

क्र. शिष्यवृत्ती/प्र.क्र. ३१ / प्रकल्प-३/६९६/ २०१७
दिनांकः ~~१८ ऑगस्ट २०१७~~ १२ सप्टेंबर

प्रति,
मा. विभागप्रमुख,
भाषाविज्ञान विभाग / मराठी विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**विषय- भाषाविज्ञान या विषयात एम.ए. करणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याबाबत**

महोदय,

राज्य मराठी विकास संस्था ही महाराष्ट्र शासनाने स्थापन केलेली संस्था असून मराठी भाषेच्या विकासासंदर्भात विविध उपक्रम करीत असते. विविध विषयांचा भाषिक शास्त्रशुद्ध अभ्यास करवून घेण्यासाठी भाषाविज्ञान या विषयात एम.ए. चा अभ्यासक्रम करू इच्छिणाऱ्या पात्र विद्यार्थ्याला वार्षिक रु. १ लक्ष २० हजार रुपयांपर्यंतची शिष्यवृत्ती देण्याची योजना सन २०१७ -१८ या वर्षापासून कार्यान्वित करायचे संस्थेने ठरविले आहे.

सदर शिष्यवृत्तीसंबंधीचे निकष पुढीलप्रमाणे आहेत :-

१) सदर शिष्यवृत्ती जास्तीत जास्त १० विद्यार्थ्यांना देण्यात येईल.

२) या शिष्यवृत्तीसाठी शक्यतो मराठी भाषक किंवा मराठीचे ज्ञान असणारा कोणत्याही शाखेचा पदवीधर विद्यार्थी ज्याने एम.ए. भाषाविज्ञान या विषयाला प्रवेश घेतला / घेणार आहे असा विद्यार्थी पात्र असेल.

३) शिष्यवृत्तीसाठी सादर करावयाच्या अर्जावर सदर विद्यार्थ्याने त्याच्या विभाग प्रमुखाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल.

४) चार सत्रांमध्ये असलेला हा अभ्यासक्रम विद्यार्थ्याने पूर्ण करणे व चौथ्या सत्रात राज्य मराठी विकास संस्थेने ठरविलेल्या विषयावर प्रकल्प सादर करणे आवश्यक आहे.

५) दरमहा देण्यात येणाऱ्या या शिष्यवृत्तीची ७०% रक्कम दरमहा दिली जाईल तर ३०% रक्कम अभ्यास समाधानकारक असल्यास व अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर एकरकमी हस्तांतरित केली जाईल.

६) शासकीय वा अशासकीय संस्था/ विभाग यांच्यामार्फत देण्यात येणाऱ्या इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा लाभ जर विद्यार्थी घेत असेल तर त्या विद्यार्थ्यांना सदर शिष्यवृत्तीचा लाभ घेता येणार नाही.

आपणास विनंती आहे, की सदर योजनेचा तपशील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याची व्यवस्था करावी तसेच आपल्या विभागात जर उपरोक्त निकषांना पात्र असलेला विद्यार्थी असेल तर त्यास जरूर या योजनेचा लाभ घेण्यास प्रोत्साहित करावे. अर्जाचा नमुना सोबत जोडला आहे, कृपया तो पाहावा.

आपला,
(सही)
(डॉ. आनन्द काटीकर)
प्रभारी संचालक

आस्थापना (सही)
M. खाडे AR 21
श्री पुनवटकर कार्यवाही व्हावी
सहपत्र—शिष्यवृत्ती अर्जाचा नमुना

# राज्य मराठी विकास संस्था

(महाराष्ट्र शासन पुरस्कृत)

एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई - ४००००१

दूरध्वनी : (०२२)२२६३१३२५ / २२६५३९६६

[illegible] संकेतस्थळ : http://rmvs.maharashtra.gov.in ★ ई-टपाल : rmvs_mumbai@yahoo.com


## एम. ए. भाषाविज्ञान अभ्यासक्रम शिष्यवृत्तीसाठी करावयाचा अर्ज

| १ | व्यक्तिगत माहिती |
|---|---|
| अर्जदाराचे नाव | |
| लिंग | |
| जन्मदिनांक | |
| राष्ट्रीयत्व | |
| वडिलांचे नाव | |
| आईचे नाव | |

| २ | संपर्क तपशील |
|---|---|
| सध्याचा पत्ता | |
| कायमचा पत्ता | |
| इ –पत्ता (इ मेल) | |
| संपर्क क्रमांक | |

| ३ | शैक्षणिक पात्रता (दहावी, बारावी, पदवी या परीक्षांबाबतचे तपशील द्यावेत) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अनु.क्र. | उतीर्ण परीक्षा | परीक्षा मंडळ / विद्यापीठ | वर्ष | वर्ग | पदवी विषय |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

| ४ | एम. ए. (भाषाविज्ञान) या अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या महाविद्यालय / विद्यापीठाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|---|
| वर्ग | महाविद्यालय / शैक्षणिक संस्था | विद्यापीठ | राज्य | वर्ष | विभागप्रमुख |
| | | | | | |
| | | | | | |

| ५ | इतर कोणती शिष्यवृत्ती मिळत असेल तर तिचा तपशील |
|---|---|
| शिष्यवृत्ती मिळते का ? | हो ☐ नाही ☐ |
| हो असेल तर शासकीय विभागाचे / संस्थेचे नाव | |
| मिळणारी रक्कम | दरमहा रु. ☐ वार्षिक रु. ☐ |

| ६ | सध्याच्या नोकरीचा / उत्पन्नाचा तपशील |
|---|---|
| **नोकरी करता का ?** | **हो** ☐ **नाही** ☐ |
| **हो असेल तर कार्यालयाचे / संस्थेचे नाव** | |
| **पद** | |
| **मिळणारे वेतन / मानधन** | **दरमहा रु.** ☐ **वार्षिक रु.** ☐ |

## प्रतिज्ञापत्र

मी..........................................................राहणार..................................असे प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो, की उपरोक्त अर्जात भरलेली सर्व व्यक्तिगत तसेच शैक्षणिक माहिती सत्य व अचूक आहे. त्यात काही असत्यता आढळल्यास सदर शिष्यवृत्ती मिळण्यास अपात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे.

दिनांक --------------

अर्जदाराचे नाव व सही

## विभागप्रमुखाचे प्रमाणपत्र

मी, विभागप्रमुख या नात्याने प्रमाणित करतो, की श्री. / श्रीम........................................................ यांनी भरलेला वरील अर्ज वाचलेला असून, त्यांनी अर्जात दिलेली माहिती आमच्या कार्यालयीन नोंदींनुसार बरोबर आहे. त्यामुळे या अर्जाचा सदर शिष्यवृत्तीसाठी विचार करण्यात यावा.

दिनांक --------------

विभागप्रमुखाचे नाव, सही व शिक्का